## रे. दरखास्त क्र. १२/२०१८ मधील नि. १६ वरील आदेश
## (जयवंत साळुंखे वि. अस्लम मकानदार)

१. दरखास्तदार यांचा अर्ज वाचला.

२. जे.डी. यांनी नि. २१ कडे दिलेले म्हणणेही वाचले.

३. मूळ दावा रे.दि.मु.नं. ६२/२०१० दि. २३/०९/२०१६ रोजी मंजूर झाल्याचे तसेच त्यामधील निकालावर झालेले रे.दि. अपील नं. ३६२/२०१६ दि. १६/०३/२०२० रोजी नामंजूर झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन व जे.डी. यांच्या लेखी म्हणण्यावरुन समोर स्पष्ट झाले आहे. दरखास्तदार यांनी प्रस्तुतची दरखास्त ही मूळ दावा रे.दि.मु.नं. ६२/२०१० चे कामी झाले हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता आणलेला आहे. जे.डी. यांनी रे.दि. अपील नं. ३६२/२०१६ चे निकालाविरुध्द दुसरे अपील दाखल करण्याकरिताची कागदपत्रे त्यांचे संबंधित वकील यांचेकडे पाठविल्याचे नमूद केले आहे. यावरुन दुसरे अपील अदयाप दाखल नाही ही बाब स्पष्ट होते. जे.डी. यांनी असेही कथन केले आहे की, लॉकडाऊनच्या पाश्वभूमीवर व मुंबई येथील अपील कामकाज बंद असल्याकारणाने जे.डी. यांना वेळेत दुसरे अपील दाखल करता आले नाही. परंतु दि. ०७/०९/२०२० पासून आजतागायत मुंबई हायकोर्ट तसेच त्याअंतर्गत येणा–या सर्व न्यायालयांचे कामकाज पूर्ववत सुरु झालेले आहे. जे.डी. यांनी सदर कालावधीत दुसरे अपील दाखल करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी दुस–या अपीलासंदर्भातील कागदपत्रे दरखास्तदार यांचा नि. १६ कडील अर्ज आल्यानंतर केवळ हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ नये यासाठी केला असल्याचे दिसते. त्यामुळे केवळ दुसरे अपील दाखल होणार आहे या कारणावर मूळ दावा रे.दि.मु.नं. ६२/२०१० चे कामातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करणे हे दरखास्तदार याचेवर अन्यायकारक होईल.

३. वादीचे दोन्ही अर्ज वाचले. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि. २६ व नि. २७ च्या पाठीमागे दाखल करून वादीचा अर्ज अमान्य केला आहे व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दरखास्तदार यांनी प्रस्तुतची दरखास्त ही सन २०१८ मध्ये दाखल केलेली आहे. जे.डी. यांची नि. २१ कडील म्हणणे लक्षात घेता ते मूळ दावा रे.दि.मु.नं. ६२/२०१० चे कामातील हुकूमनामा मानणेस तयार नाहीत असेच दिसते. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २१, रुल ३५, सब रुल ५ अन्वये हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसंदर्भात पुढील आदेश पारीत करणेत येत आहेत.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. कोर्ट बेलीफ यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी रेदिमुन ६२/२०१० चे हुकूमनाम्यामध्ये नमूद केलेप्रमाणे सदर हुकूमनाम्यातील वाद रस्त्याच्या पूर्वेस दक्षिणोत्तर चालीची वादीच्या बाजूकडील भिंतीत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी काढलेल्या दोन खिडक्या मुजवाव्यात व त्याकरिता लागणारे आवश्यक साहित्य व मजूर यांची पुर्तता दरखास्तदार यांचेकडून करुन घेऊन त्याबाबतचा खर्च जे.डी. यांचेकडून वसूल करुन घ्यावा.

३. दरखास्त्दार यांनी सरकारी नियमानुसार आवश्यक असणारा बेलीफ भत्ता भरुन घ्यावा व प्रत्यक्षात हुकूमनाम्यातील आदेशाची अंमलबजावणी होताना जागेवर हजर राहून कोर्ट बेलीफ यांना योग्य ते सहकार्य करावे.

URMILA PARASHRAM KOLI

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2022.02.18 17:26:01 +0530

मिरज. ( श्रीमती यु. पी. कोळी )

दि. १८/०२/२०२२ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou. A.C. Patil (Grade-III) |
| Court | : | IIIrd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 18/02/2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 18/02/2022 |